नि.फौ.ख.नं. २०८/२०१६

नि.६३

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र. ०२ यांची जबानी

मी शपथेवर साक्ष देतो की,

माझे नांव – सिताराम रंगनाथ दहातोंडे

वय – ५४ वर्षे, व्यवसाय – शेती,

रा. सालेवडगांव , ता.आष्टी, जि.बीड

---

**सर तपासणी सरकारतर्फे श्री.बी एस नाकाडे वकील यांचे मार्फत–**

१. मी सदर प्रकरणातील फिर्यादि व आरोपी यांना ओळखतो. ए पी आय गुरमे यांनी मला दिनांक १९/०५/२०१५ रोजी पंचनाम्यासाठी दुपारी तीन ते चार च्या दरम्याने म्हतारदेव पाटीलबा डोके यांच्या वस्ती समोर बोलाविले. सदरची वस्ती च्या समोर गट नंबर १६७ , १६८ चा बांध आहे त्या बांधावर आम्हाला पोलीसांनी बोलाविले. त्यावेळेस माझ्या सोबत दुसरा पंच विठठल बबन खाकाळ हा होता. फिर्यादि ने आम्हला घटनास्थळ दाखविले. घटनास्थळावर दोन दिवसा पुर्वी भांडण झाले होते असे फिर्यादिने आम्हला सांगितले होते. ज्या ठिकाणी पंचनामा केला त्याच्या पुर्वेस म्हतारदेव पाटीलबा यांची वस्ती, पश्चीमेला रस्ता, दक्षीणेला उषाबाई डोके यांची जमीन, आणि उत्तरेला म्हतारदेव यांची पडीक जमीन आहे.

२. सदरचा पंचनामा हा साधारण अर्धा तास चालला. सदरचा पंचनामा हा पोलीसांनी आम्हाला वाचुन दाखविला. त्यांनतर आम्ही त्यावर सहया केल्या. पंचनामा वर अ. क्र. २ वर माझी सही आहे. सदर पंचनाम्यावर मजकुर व नकाशा हा खरा व बरोबर आहे. सदर पंचनाम्यास **पी २ – पी डब्लयु २** देण्यात येते. सदरचा पंचनामा झालयांनतर मला पोलीसांनी दिनांक २१/०५/२०१५ रोजी संध्याकाळी साधारण पाच वाजण्याच्या दरम्याने नारायण डोके यांचे वस्तीवर बोलाविले. त्याठिकाणी पोलीसांनी हत्यार जप्त केले. नारायण डोके यांनी सदरचे हत्यार हे घरातुन काढुन दिले. त्यामध्ये एक कु–हाड आणि एक तलवार होती. जी कु–हाड होती त्याचा लाकडी दांडा अडीच ते तीन फुट लांबीचा होता. लोखंडी तलवार ही अंदाजे अडीच फुटाची होती. नारायण डोके यांनी कु–हाड आणि तलवार काढून दिल्यानंतर पोलीसांनी ते जप्त केले. माझ्या सोबत दुसरा पंच म्हणुन शिवाजी किसन डोके हा हजर होता. ज्यावेळेस नारायण ने वस्तु काढुन दिल्या त्यावेळेस पोलीसांनी जप्ती पंचनामा केला. आता मला अभिलेखावर दाखल असलेला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. तो तोच असुन त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर अ. क्र २ वर माझी सही आहे. त्यास **निशाणी पी ३ , पी डब्लु २** देण्यात येते. जप्ती पंचनाम्यावर आरोपी नारायण विठठल डोके यांनी सही केली आहे. पोलीसांनी हत्यारे जप्त केली तेंव्हा त्यांनी कागदावर आमच्या सहया घेवुन ती कागदे हत्याराला

लावली. आता मला **एम ओ १ कु–हाड आणि एम ओ २ तलवार** दाखविण्यात आली सदरची तलवार आणि कु–हाड आरोपी ने आम्हाला जप्ती पंचनाम्याचे वेळेस काढुन दिलेली आहे. साक्षीदाराने कोर्टासमक्ष आरोपी नारायण विठठल डोके यांना ओळखले.

सरतपास पुर्ण.

<u>**उलटतपास आरोपींच्या वतीने श्री. एस.बी.म्हस्के वकील यांचे मार्फत**</u>

३. हे म्हणणे खरे आहे की, सालेवडगांव ते आंबेवाडी या रस्त्यावर गावाच्या उत्तरेला आमची वस्ती आहे. आमची वस्ती गावापासुन अर्धा किलोमीटर पेक्षा कमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, म्हतारदेव डोके ची वस्ती ही गावाच्या पुर्व बाजुला असुन ती गावापासुन एक किलोमीटर अंतरावर आहे. हे म्हणणे खरे आहे की, आमची सर्व जमीन आणि वस्ती गावाच्या उत्तर बाजुला आहे. हे म्हणणे खरे आहे की, फिर्यादि हा माझा जावई आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रकरणातील दुसरा पंच शिवाजी डोके हे माजी सरपंच , सेवा सोसायटीचे चेअरमन , पंचायत समीतीचे सभापती व जिल्हा परीषद सदस्य होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, विठठल डोके आणि शिवाजी डोके हे एकमेकांचे भावकी आहे. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या पश्चीम बाजुस सर्वे नंबर १६७ मधील जमीन विलास कुलकर्णी कडुन म्हतारदेव डोके व विठठल डोके यांनी खरेदी केलेली आहे. विलास कुलकर्णी कडुन घेतलेले क्षेत्र हे खरेदी खताप्रमाणे भरुण येते का नाही याबाबत मला काही सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, रस्त्याच्या पुर्व बाजुला असणा–या सर्वे नंबर १६८ ची जमीन खरेदी केलेली आहे. सालेवडगांव ते कडा हा गाडीरस्ता जुना असुन सदरचा रस्ता हा फिर्यादिने तो आडवला त्या कारणाने आरोपीने तहसील दार साहेबाकडे तक्रार दिली होती का नाही याबाबत मला काही सांगता येत नाही. मोजणी झालयांनतर तहसीलदार व कलेक्टर आले होते की नाही याबाबत मला काही सांगता येत नाही.

५. सर्वे नंबर १६८ कडे मी आज पासुन पंधरा दिवसापुर्वी गेलेलो आहे. पोलीस हे मला गावामध्ये भेटले होते. गावामधुन पोलीसांनी मला म्हतारदेव डोके यांचे वस्तीवर घेवुन गेले. त्यावेळी दुसरा पंच विठठल खाकाळ हा माझ्यासोबत गावामध्ये उपस्थीत होता. हे म्हणणे खरे आहे की, मी , विठठल खाकाळ आणि पोलीस ए पी आय गुरमे आम्ही सर्वजन मिळुन घटनास्थळावर गेलो. त्यावेळी गावातील इतर लोक आमच्या सोबत आले नाहीत. त्यादिवशी मी एका ठिकाणी सही केली आहे.

६. घटनास्थळाचा पंचनामा झाल्यानंतर पोलीसांनी मला दोन दिवसांनी बोलावुन घेतले. हे म्हणणे खरे आहे की, मी, शिवाजी डोके आणि पोलीस आम्ही नारायण डोके यांच्या वस्तीवर गेलो. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही वस्तीवर गेलो त्यावेळेस नारायण डोके हा तेथे हजर होता. हे म्हणणे खरे आहे की, आम्ही गेलो तेंव्हा सालेवडगांव ते कडा रस्त्यावर मी आणि शिवाजी डोके उभे राहिलो आणि ए पी आय गुरमे हे देखील आमचे सोबत उभे होते.

७. मी नारायण डोके यांचे घरात हिंडलो नाही. त्याच्या घरामध्ये शिवाजी डोके गेले नाही.

गुरमे साहेब नारायण डोके च्या घरामध्ये गेले होते. गुरमे साहेबांना नारायण डोके यांच्या घरात जान्याअगोदर आम्हाला अंगझडती दिली होती. अंगझडती चा पंचनाम्यात उल्लेख केला का नाही याबददल मला लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी आमच्या फॉम् वर सहया घेतल्या आणि पोलीस निघुन गेले. हे म्हणणे खरे नाही की एकवीस तारखेला आम्ही नारायण डोके यांचे वस्तीवर गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की माझ्यासमोर कु–हाड आणि तलवाल जप्त केली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की नारायण ने कु–हाड व तलवाल काढुन दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की नारायण हा जप्ती पंचनाम्याच्या वेळी हजर नव्हता. माझ्या जावयाच्या विरुध्द म्हणजेच फिर्यादि च्या विरुध्द आरोपीनी रस्तयाचा दावा दिला आहे की नाही याबददल मला काही सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की मला पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनाम्यासाठी बोलावीले नाही. हे म्हणणे खरे नाही की फिर्यादि व जावयाला मदत व्हावी म्हणुन आज रोजी मी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

( एस.व्ही.उतकर )

दि.१०–०१–२०२४ प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, आष्टी.